# किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई.

## (बृहन्मुंबई, ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यांकरिता) (महाराष्ट्र शासन)

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम ६(१) अन्वये स्थापिलेले

मुख्य कार्यालय : ५१५, मध्यवर्ती सुविधा इमारत, ६ वा मजला, फळे व भाजीपाला मार्केट, तुर्भे, नवी मुंबई.
दुरध्वनी : २७८४ २३७६ / २७८४ ४११९ (Email ID : grocery@rediffmail.com)

संदर्भ क्र. जीआरवाय/आस्था/ ९०६ /२०२४ दि. २३/०४/२०२४

**विषय :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुक -२०२४ करिता लोकसभा मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी देण्याबाबत.

**वाचा :** उद्योग ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग , शासन परिपत्रक क्रमांक – संकीर्ण २०२४/प्र.क्र.६७/कामगार -९ दिनांक ०५ एप्रिल २०२४.

**-: प रि प त्र क :-**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकांसाठी सदर क्षेत्रातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत शासनाने दि.०५ एप्रिल २०२४ च्या परिपत्रकाद्वारे निर्देश दिलेले आहेत.

शासनाच्या उक्त परिपत्रकानुसार किराणा बाजार व दुकाने मंडळातील सर्व कर्मचाऱ्यांना तसेच नोंदीत कामगारांना संबंधित मतदान क्षेत्रामध्ये निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी खालील दिनांकास भरपगारी सुट्टी मंजूर करण्यात येत आहे. तसेच अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टीऐवजी दोन ते तीन तासांची सवलत देण्यात यावी. तथापि, त्याबाबत संबंधित महानगर पालिका अथवा जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

शासन परिपत्रकासोबत जोडलेल्या परिशिष्ट अ नुसार तिसऱ्या टप्पयामध्ये रायगड जिल्हयातील मतदान दि. ०७/०५/२०२४ रोजी तर पाचवा टप्पयामध्ये बृहन्मुंबई, मुंबई उपनगरे, ठाणे व पालघर जिल्हयातील मतदान दि. २०/०५/२०२४ रोजी असल्याने मंडळाचे नोंदीत कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी रजा मंजूर करण्यात येत आहे.

सचिव,
किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई.

..२..

प्रति,

१) सर्व नोंदीत मालक असोसिएशन
( मुंबई /ठाणे/पालघर / रायगड जिल्ह्यातील)

२) सर्व अधिकारी / सर्व कर्मचारी

३) सर्व नोंदीत कामगार.

४) नोटीस बार्ड

CamScanner